अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती.

# NOTICE

Tuljaram Chaturchand College Baramati

Displayed on- 23/09/2023 Notice No. 314

## कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील जात संवर्गातील (कॅटेगरी) व वरिष्ठ महाविद्यालयातील राजर्षी शाहू महाराज शिक्षणशुल्क योजना (ई.बी.सी.) विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप/फ्रिशिपसाठी खालील कागदपत्रे तयार ठेवणेबाबत अत्यंत महत्वाची सूचना:—

शै.वर्ष २०२२—२३ एस.सी., एस.टी, एन.टी., ओ.बी.सी., व एस.बी.सी या जातसंवर्गातील व राजर्षी शाहू महाराज शिक्षणशुल्क योजना (ई.बी.सी.) विद्यार्थ्यांचे महाडीबीटी पोर्टलवर स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरणेकरिता वेबसाईट लवकरच सुरु होत आहे. तरी, विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे आपली कागदपत्रे तयार ठेवावीत.

**www.mahadbtmahait.gov.in** या वेबसाईटवर शिष्यवृत्तीचे फॉर्म भरणेसाठी शासनाचे परिपत्रक आलेनंतर फॉर्म कसा भरावा यासाठीची मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे आहे.

### ऑनलाईन फॉर्म भरणेकरीता खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

१. विद्यार्थ्याचा स्वत: च्या नावाचा जातीचा दाखला.

२. सन २०२१—२२ मधील मा. तहसिलदारांचा विद्यार्थ्याच्या वडीलांचे नावे उत्पन्नाचा दाखला एस.सी, एस.टी या कॅटेगरीसाठी साठी स्कॉलरशिपकरीता उत्पन्नाची मर्यादा रु.२,५०,०००/— आहे व एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी. या कॅटेगरीसाठी साठी स्कॉलरशिपकरीता उत्पन्नाची मर्यादा १,५०,०००/— आहे. तसेच एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी. या कॅटेगरीच्या फ्रिशिपच्या विद्यार्थ्यांसाठी व राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेच्या (ई.बी.सी.) विद्यार्थ्यांसाठी उत्पन्नाची मर्यादा रु.८,००,०००/— पर्यंत आहे.

३. वडील हयात नसतील तर आईचा उत्पन्नाचा दाखला व सोबत वडिलांच्या मृत्युच्या दाखल्याची झेरॉक्स जोडावी.

४. आधारकार्ड झेरॉक्स.

५. आधारकार्ड बॅंकखाते व मोबाईल नंबरशी संलग्न असणे आवश्यक

६. मागील वर्षीचे मार्कशिट.

७. गॅप असेल तर गॅप ॲफिडेव्हीट आवश्यक.

८. डोमासाईल सर्टिफिकेट.

९. शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स व पी.जी. साठी टी.सी. जोडावा.

१०. स्वत: चे राष्ट्रीयकृत बॅकेत खाते असलेले बॅकपासबुक.
( आयएफएससी कोड व एमआयसीआर कोड नंबरचा पहिल्या पानावर शिक्का असणे आवश्यक आहे.)

११. रेशनकार्ड झेरॉक्स. (पहिले पान व कुटंबाचे नाव असलेले पान)

१२. शैक्षणिक वर्ष २०२२—२३ चे प्रवेश फी चलन झेरॉक्स.

१३. महाडीबीटीवरील ऑनलाईन प्रतिज्ञापत्र अपलोड करावे.

१४. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरताना करंट डिटेलस् या कॉलममध्ये फी पेड झिरो (शून्य) टाकणे अनिवार्य आहे. अन्यथा रक्कम टाकल्यानंतर कॉलेजने दिलेली फी सवलतीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बॅक खात्यावर जमा होईल व विद्यार्थ्यास पुन्हा महाविद्यालयाकडे रक्कम भरावी लागेल याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

१५. स्कॉलरशिप फॉर्म भरताना करंट डिटेलस् या कॉलममध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेश ग्रॅंट मध्ये असेल तर **Aided** टाकावे व नॉनग्रॅटमध्ये प्रवेश असेल तर **UnAided** असे टाकावे. तसेच कॉलेजचे नाव बरोबर सिलेक्ट करावे.

१६. विद्यार्थ्यांना एकावेळी एकाच शिष्यवृत्ती योजनेचा फॉर्म भरावा. जर एखाद्या विद्यार्थ्याने कोणत्याही दोन योजनेचे फॉर्म भरल्यास एक योजना रिजेक्ट होते व यामध्ये कॅटेगरीतील विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होते. यासाठी विद्यार्थ्यांनी शक्यतो महाडीबीटी वरील पोस्ट मॅट्रीक स्कॉलरशीपचाच फॉर्म भरावा व एकाच योजनेसाठी अर्ज करावा.

१७. विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरताना खाली दिल्याप्रमाणे महाविद्यालयाचे नाव निवडावे/सिलेक्ट करावे.

**Senior College - Tuljaram Chaturchand College (0)**
**Junior College - Tuljaram Chaturchand College (27250211827)**

**Vocational (Jr.College) MCVC - ANEKANT EDUCATION SOCIETY'S TULJARAM CHATURCHAND COLLEGE (2765211090)**

महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी फॉर्मची प्रिंट व वरील कागदपत्रे स्वत:जवळ ठेवावीत. विद्यार्थ्यांनी हार्ड कॉपी महाविद्यालयामध्ये जमा करण्याची गरज नाही. ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश हा फी सवलतीत झालेला आहे अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन स्कॉलरशिप/फ्रिशिपचा फॉर्म भरला नाही तर संबंधित विद्यार्थ्याच्या होणा—या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील व महाविद्यालयाची उर्वरित फी भरावी लागेल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

Tuljaram Chaturchand College Baramati

प्राचार्य

D:\users\amsolankar\Scholarship 2020-21\Scholarship Notice 2020-21\Scholarship Notice New 2020-21.docx